# एम.एम. जगताप महाविद्यालयामध्ये "राष्ट्रीय विज्ञान दिन"उत्साहात साजरा.

महाड –महाड येथील लोकविकास सामाजिक संस्थाचे एम.एम. जगताप महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन 28 फेब्रुवारी 2025 रोजी सी.व्ही रामन या थोर शास्त्रज्ञाच्या स्मरणार्थ मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात होणाऱ्या नव्या प्रगतीची महती लक्षात घेत या कॉलेज मध्ये विविध विज्ञानविषयक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. विद्यार्थ्यांना विज्ञानाची महती समजावून सांगण्यासाठी आणि त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टिकोन वाढवण्यासाठी विविध स्पर्धा, मोडेल, प्रयोग आणि प्रदर्शने आयोजित करण्यात आली. यावेळी विज्ञान क्षेत्रात विद्यार्थांनी केलेल्या उल्लेखनीय मोडेल, प्रयोग आणि प्रदर्शने कार्याचे परीक्षण व मूल्यमापन करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मा.श्री जगदीश काबरे सांगली, डॉ.अंजली पुराणिक पाली, डॉ.जगदीश ठाकुर,गोरेगाव, प्रा.अनिल निटवे सांगली आणि संस्थेचे चेअरमन श्री. हनुमंत जगताप (नानासाहेब) तसेच संस्थेचे पदाधिकारी श्री संजयजी चिखले व भूपेश पाटील, रोहित पोरे,स्मिताली यादव इ मान्यवर लाभले.

विज्ञानाद्वारे होण्याऱ्या फायद्याबद्दल समाजात जागरूकता निर्माण व्हावी आणि विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन, निर्माण व्हावा यासाठी राष्ट्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान परिषद व विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयाच्या अंतर्गत राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा केला जातो.

दरवर्षी नवीन विषय थीम असते. यावर्षी, "विकसित भारताकरिता युवकांना विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात जागतिक स्तरावर नेतृत्व करण्यासाठी प्रेरित करणे" अशी होती. यात थिमला धरून एम.एम जगताप महाविद्यालयाच्या विज्ञान विभागाकडून विद्यार्थ्यांसाठी विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन केले होते. यामध्ये एकूण 24 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांनी विविध प्रयोगातून आपली विज्ञान विषयक मते मांडली. यामधून सर्वोत्कृष्ट विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. यामध्ये प्रथम क्रमांक सामीन उभारे (F.Y.B.Sc)आणि सना कोंडीवकर (T.Y.B.Sc)यांना देण्यात आला. तसेच अनम चांदले (T.Y.B.Sc) आणि सहेर झटाम (T.Y.B.Sc) यांना द्वितीय क्रमांक देण्यात आला. तसेच तृतीय क्रमांक अथर्व जगताप, हर्षद गायकवाड (F.Y.B.Sc) आणि दानिया गीते(T.Y.B.Sc) यांना देण्यात आला. या स्पर्धेचे परीक्षण मूल्यमापन प्रमुख पाहुण्यांनी केले.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना राज्य पुरस्कार प्राप्त विज्ञान प्रसारक, लेखक व शिक्षक मा.श्री जगदीश काबरे यांनी विद्यार्थ्यांना आपल्या जीवनामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करावा असे आवाहन केले. तसेच डॉ.अंजली पुराणिक जे.एन.पालीवाला कॉलेज पाली यांनी विज्ञानातील प्रामाणिकपणा व्यवहारात आणून आपले दैनदिन जीवन जगण्यासाठी प्रयत्नशील रहा असा प्रेमळ सल्ला दिला. तसेच रसायनशास्त्र प्राध्यापक डॉ.जगदीश ठाकूर दोशी वकील कॉलेज गोरेगाव यांनी विद्यार्थांनी केलेल्या विज्ञान प्रदर्शनाचे कौतुक करून विद्यार्थ्यांनी मुंबई विद्यापीठामार्फत होत असलेल्या अविष्कार संशोधन उपक्रमात जास्तीत जास्त संख्येने भाग घेण्याचे आव्हान केले. तर समारोपाच्या भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.एन वाणी यांनी महाविद्यालयात अशा प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन सातत्याने करण्यात येते हे सांगून जगभरात विज्ञानाच्या महत्त्वावर चर्चा केली आणि त्याच्या शोधांना मानवतेच्या उन्नतीसाठी कसे उपयोगी ठरवता येईल यावर प्रकाशझोत टाकला आणि शुभेच्छा दिल्या. तसेच या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि प्रास्ताविक विज्ञान विभाग प्रमुख प्रा. मोक्षदा म्हस्के यांनी उत्कृष्टपणे केले. तसेच उपस्थित पाहुण्यांचा परिचय प्रा.अपर्णा जाधव यांनी केला तर आभार प्रदर्शन प्रा.अनामिका खर्डेकर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अंजय धनावडे, प्रा.ऐश्वर्या पाटील, प्रा. एकता नाडकर, कु. दिव्या तांबे यांनी विशेष मेहनत घेतली व विद्यार्थ्यांना प्रयोग मांडण्यास सहकार्य केले. आणि हा कार्यक्रम सर्व शिक्षकवर्ग, विद्यार्थीवर्ग व श्री एकनाथ खेडेकर (शिपाई) यांच्या सहकार्याने मोठ्या आनंदात पार पडला.






M.M.JAGTAP COLLEGE of
Arts, Science & Commerce
Mahad-Raigad
Geo-Tagging Camera
2025/02/28 14:54
Mahad,Maharashtra,India
3CJH+396, Bazar Peth, Mahad, Maharashtra 402301, India
Lat 18.080165 Long 73.428296






M.M.JAGTAP COLLEGE
OF ARTS, SCIENCE & COMMERCE
TAL. MAHAD, DIST. RAIGAD


M.M.JAGTAP COLLEGE
OF ARTS, SCIENCE & COMMERCE
TAL. MAHAD, DIST. RAIGAD



